# बृहन्मुंबई महानगरपालिका

कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष कर्करोग आणि

बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)

(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)

क्र. एलटीएच/573 /सीटीसी, दि.23 /09 /2025

**विषय:** मनपा- कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र येथील "अति विशेष सेवा, सुविधा व उपचार" केंद्रासाठी कंत्राटी तत्वावर **डॉक्टर्स, निमवैद्यकिय कर्मचारी** या संवर्गातील सद्यस्थितीत रिक्त झालेली कंत्राटी पदे जाहिरातीद्वारे निवड समितीच्या मार्फत मुलाखत घेऊन कंत्राटी तत्वावर भरण्याबाबत प्रस्ताव.

**संदर्भ:** 1) मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/ 5292 दि. 13.01.2025 (पृ. क्र. सी - 1 ते सी - 37)

2) मा. अधिष्ठाता (लोटीमस रुग्णालय) यांचा संदर्भ क्र. एलटीएच/ 19450/ डीएम दि. 29.08.2025(पृ. क्र. एन- 9 ते एन-10)

दि.19.09.2025, शुक्रवार रोजी मा. संचालक सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र, बोरीवली यांची मा. अधिष्ठाता लोटीमस रुग्णालय यांच्या दालनात त्यांच्या समवेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने पुनःश्च प्रस्ताव मंजुरीकरीता पाठवित आहोत.

मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/ 5292/ दि. 13.01.2025 (पृ. क्र. सी - 1 ते सी - 37) अन्वये मनपा - कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष- कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र येथील डॉक्टर्स, निमवैद्यकिय कर्मचारी व चतुर्थश्रेणी कामगार यांच्या सद्यस्थितीतील एकुण 140 कंत्राटी पदांना दि. 02.12.2024 ते दि. 30.11.2026 पर्यंत पद सातत्य राखण्याकरीता मंजुरी प्राप्त आहे.

सदर केंद्राचा कार्यभार सोबत (पृ. क्र. सी - 63 ते सी - 65) व पदांची कर्तव्यसूची (पृ. क्र. सी - 67 ते सी - 99) वर जोडण्यात आलेली आहे.

मा. महागरपालिका आयुक्त यांच्या मंजुरी अन्वये (पृ. क्र. सी - 1 ते सी - 10) पदसातत्य राखण्याकरिता मंजुरी प्राप्त झालेल्या 140 कंत्राटी तत्वावरील पदांचा संक्षिप्त तक्ता सी - 11 वर लावण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील नमूद केलेल्या तक्त्यामधील पदे पदधारकांनी राजीनामा दिल्यामुळे व 1 परिचारिका पद प्रसुती रजेच्या कारणास्तव 6 महिन्यांकरीता रिक्त झालेली आहेत.

खालील नमूद केलेल्या संवर्गातील 16 पदे त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या कारणास्तव रिक्त झालेली आहेत.

तक्ता क्र. 1

| अ.क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | ठोस वेतन दरमहा (रू.) | एकूण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय संक्रमण सल्लागार (पुर्णवेळ) | 2,16,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 2 | कनिष्ठ सल्लागार बालरोग रक्तदोष - कर्करोग तज्ञ | 1,50,000/- | 3 | 2 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 3 | अति दक्षता बालरोग तज्ञ (पुर्णवेळ) | 1,50,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 4 | सहाय्यक वैद्यकिय अधिकारी | एम.बी.बी.एस. 90,000/-<br>एमडी 1,00,000/- | 2 | 1 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 5 | मानद बालरोग शल्यक्रिया तज्ञ | 20,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 6 | मानद त्वचारोग तज्ञ | 20,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 7 | मानद हृदयरोग तज्ञ (बालरोग) | 20,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 8 | मानद नेत्ररोग तज्ञ | 20,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 9 | मुख्य पारिचारिका / पारिचारिका समन्वयक | 81,900/- (सेवानिवृत्त मनपा कर्मचाऱ्यांकरिता पे – पेन्शन) | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 10 | श्रवणतज्ञ (अर्धवेळ) | 20,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 11 | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | 40,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 12 | समुपदेशक | 35,000/- | 1 | 0 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 13 (अ) | परिचारीका | 30,000/- | 28 | 26 | 1 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे. |
| 13 (ब) | परिचारीका (LOCUM) (प्रसुतीच्या कालावधीमध्ये 6 महिन्यांकरीता) | | | | 1 | पदधारक प्रसुती रजेवर असल्यामुळे सदर पद तात्पुरत्या स्वरूपात भरण्याकरीता |
| 14 | डाटा एन्ट्री ऑपरेटर | 18,000/- | 3 | 1 | 2 | पदधारकानी राजीनामा दिल्यामुळे |
| | | | | एकूण पदे | 16 | |

टिप- डाटा एन्ट्री ऑपरेटरकरीता संगणकावर मराठी व इंग्रजी करीताची टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी (टायपिंग ट्रेड टेस्ट) घेण्यात येईल.

सदर केंद्राकरिता रिक्त असलेली पदे या सेंटरमधील "अति विशेष रुग्णसेवा, सुविधा व उपचार" केंद्राचे कामकाज सुरळीत चालू राहण्याकरीता भरणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे **मा. अधिष्ठाता (लोटिमस) / मा. संचालक (वै.शि. व प्र.रु)** यांनी खालील बाबींस कृपया मंजूरी द्यावी.

1. सदर प्रस्तावात नमुद केलेली तात्पुरत्या स्वरुपातील कंत्राटी तत्वावरील 16 रिक्त पदे भरण्यासाठी 03 स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन व रुग्णालयाच्या सुचना फलकावर जाहीरात प्रदर्शित करण्यास तसेच पृष्ठ क्र. एन - 33 वरील जाहिरात व अर्जाचा नमुना व अटी आणि शर्ती (पृ. क्र.सी - 125 ते सी - 133) हे मनपाच्या **http://www.mcgm.gov.in**, तसेच मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्राच्या **http://www.ctcphobmt.com** व लोटिमस रुग्णालयाच्या **http://www.ltmgh.com** या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यास.

2. सदर प्रस्तावित 03 स्थानिक भाषेतील वृत्तपत्रातील जाहिरातीचा खर्च जनसंपर्क विभागाच्या योग्य त्या अर्थसंकल्पिय लेखाशिर्षातुन भागविण्यास.

3. मनपाच्या **http://www.mcgm.gov.in** तसेच मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्राच्या **http://www.ctcphobmt.com** व लोटिमस रुग्णालयाच्या **http://www.ltmgh.com** या संकेत स्थळावर जाहिराती स[illegible] विहित नमुन्यात उपलब्ध असणारा अर्ज इच्छुक उमेदवारांकडून सर्व आवश्यक प्रमाणपत्र व अर्ज शुल्कासहीत (सुधारीत अर्ज शु[illegible] संदर्भ: सार्वजनिक आरोग्य खाते परिपत्रक, एचओ/पी/30319/लेखा दि. 10.03.2025 (पृ.क्र.सी - 61) नुसार स्विकारुन, अर्जांची छाननी व पडताळणी केल्यानंतर, मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची यादी मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्राच्या **http://www.ctcphobmt.com** या संकेत स्थळावर जाहीर करुन पात्र उमेदवारांची मुलाखत **मा. महानगरपालिका आयुक्त** यांच्या मंजुरी क्र. एमजीसी/एफ/1271 दि. 28.11.2023 अन्वये **संघटीत** करुन **स्थापित** केलेल्या **निवड समिती** मार्फत मुलाखतीतील गुणवत्ते अन्वये निवड करण्यास.

4. सदर पदांकरीता पृ. क्र. एन- 1 वरील तक्ता क्र. 1 मध्ये प्रशासकीय मंजुरी अन्वये नमुद केलेले ठोस वेतन मनपा - सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र, बोरीवली (पू) च्या निधी केंद्र संकेतांक 1000625188 च्या अर्थसंकल्पीय लेखा शिर्षक 220800400 च्या उपलब्ध अर्थसंकल्पिय तरतुदी मधून भागविण्याकरीता.

5. सदर पदांच्या कंत्राटाचा कालावधी 1 वर्षाकरीता असेल व दर 6 महिन्यांनी एक दिवसाचा तांत्रिक सेवा खंड देऊन पुनःर्नियुक्ती करण्यास.

6. मुख्य पारिचारिका हे पद नर्सिंग विभागाअंतर्गत विभाग प्रमुख या संवर्गातील असल्यामुळे अनुभवी व प्रशिक्षित मनुष्यबळ वय[illegible] अटीमुळे अशासकीय सेवेतून निवृत्तधारक (वय वर्षे 50) असल्यामुळे उपलब्ध होत नसल्यामुळे सदर पदाचे वय हे 50 वर्षाहून 55 ठेवणे संयुक्तिक व गरजेचे आहे. त्यामुळे सदर रिक्त तात्पुरत्या स्वरूपातील कंत्राटी तत्वावरील पदाची जाहिरात देऊन भरण्याकरीता वयाची अट शिथिल करून ती वयोमर्यादा 55 इतकी करण्यात यावी, ही विनंती.

7. **अ. क्र. 13 (ब)** वरील **परिचारिका (LOCUM)** यांची नियुक्ती फक्त 6 महिन्यांकरीता किंवा प्रसुती रजेवरील कर्मचारी यांच्या कामावर रुजु होणाऱ्या दिवसापर्यंतच असेल. त्यापैकी जे आधी असेल त्याच दिवशी सेवा संपुष्टात येईल.

8. **अ.क्र.** 14 वर नमुद करण्यात आलेल्या संवर्गातील पदाकरीता **टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी (टायपिंग ट्रेड टेस्ट)** घेण्यास.

9. कंत्राटी तत्वावरील निवडण्यात आलेली उमेदवारांची **प्रतिक्षा यादी पुढील 1 वर्षाकरीता** ग्राहय धरण्यास.

10. सदर नमूद पदांवर नेमणूक होणाऱ्या उमेदवारांकडून सदर कंत्राटीच्या सहा महिन्यांच्या नेमणूकीच्या कालावधीकरीता उप कायदा अधिकारी (औद्योगीक व कामगार न्यायालय) संदर्भ क्र. LOP/44/MC दि. 08.01.2017 च्या कंत्राटी नेमणूकीच्या अटी व शर्ती यांच्या आधीन राहून अभिप्राया अन्वये कोर्ट स्टॅम्पवर **"प्रतिज्ञापत्रा सह हमीपत्र" रितसर 'नोट्रीसह'** करारनामा लिहून घेण्यासापेक्ष नेमणूक करण्यास.

N-31

11. पात्र उमेदवारांकरीता मुलाखतीची दिनांक व वेळ संकेतस्थळावर प्रदर्शित करुन सर्व पात्र उमेदवारांची मुलाखत मनपा- कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू), मुंबई - 400 066 येथे घेण्याकरीता.

12. तात्पुरत्या स्वरुपातील कंत्राटी तत्वावरील निवड प्रकिया कुठल्याही वेळी स्थगित करण्याचे अधिकार हे **मा. महानगरपालिका आयुक्त** यांना राहतील.

सविनय सादर.

23/09/2025

**डॉ. संतोष खुडे**
**उप संचालक,**
**मनपा - सीटीसी, पीएचओ**
**आणि बीएमटी केंद्र.**

23/09/2025

**डॉ. रत्ना शर्मा**
**संचालक,**
**मनपा - सीटीसी, पीएचओ**
**आणि बीएमटी केंद्र.**

23/9/25

**डॉ. मोहन जोशी**
**मा. अधिष्ठाता**
**(लोटिमस रुग्णालय)**

approved the eligibility, age relaxation already.

No. Director/M.E. & M.H./3154
30/9/2025

यथा प्रस्तावित मंजूर

**डॉ. नीलम अंद्राडे**
**मा. संचालक (वै.शि. व प्र.रु)**

संचालक
(बी एम टी केंद्र)

23/9/25
Director (M.E.&M.H.)

संचालक (वै.शि.व प्र.रु.)
24 SEP 2025
आवक क्रमांक: 3154
दिनांक:
देय:
नस्तीधारक

बृहन्मुंबई महानगरपालिका
संचालक, सी.टी.सी., पी.एच.ओ.
आणि बी.एम.टी. केंद्र यांचे कार्यालय
दिनांक 01 OCT 2025
क्र. एल टी एच / 601 /

अधिष्ठाता (लोटिऌ) यांचे कार्यालय
23 SEP 2025
क्रमांक : अधिष्ठाता / 3680

Noted
Sanction on Pg No N-29/N-33
[signature]
01/10/2025
Dy. Director

[signature] 1/10/2025
Director

[signature]
Director (A & P)

Schedule

Date of Advt in Newspaper - 04/10/2025 (Friday)

Form submission date - 06.10.2025 (Monday)
To.
14.10.2025 (Tuesday) } working 7 days

List of Eligible candidate
to publish on website - 15.10.2025 (Wed)

Interview date - 16.10.2025 (Thursday).

## बृहन्मुंबई महानगरपालिका

कॉम्प्रिहेन्सिव थॅलसेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि
बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)
(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)

क्र. एलटीएच/ /सीटीसी

दि. / /2025

## जाहिरात

मनपा - कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू) येथील अति विशेष सेवा, सुविधा व उपचार केंद्राकरीता अनु क्र 1 ते 14 (अनु. क्र. 13(ब) वगळून) नमूद केलेली पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर 1 वर्षाच्या कालावधीकरीता दर 6 महिन्यांनी एक दिवस तांत्रिक सेवा खंड सापेक्ष भरावयाची आहेत.

विहीत नमुन्यातील अर्ज मनपाच्या http://www.mcgm.gov.in तसेच या रुग्णालयाच्या http://www.ctcphobmt.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी पदासाठी रू. 790 + 18% GST इतके अर्ज शुल्क आणि सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, सर्व प्रमाणपत्रांच्या स्वंय साक्षांकीत छायांकित प्रती, अलीकडेच काढलेले पासपोर्ट छायाचित्र त्यावर चिकटवून मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू), मुंबई - 400066 येथे दि. / /2025 ते दि. / /2025 पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) स.10.00 ते दु. 01.00 पर्यंत भरुन द्यावे. अपूर्ण अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

| अ. क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | अर्हता | वयोमर्यादा (कमाल वर्ष) | पद संख्या | ठोक वेतन दरमहा(रू.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय संक्रमण सल्लागार (पूर्णवेळ) | एमडी/डीएनबी (ट्रान्सफ्युजन मेडिसिन) (किंवा) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन इम्युनो-हेमॅटोलॉजी आणि रक्त संक्रमण (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी आणि 5 वर्षाचा अनुभव. | 50 वर्ष | 1 | 2,16,000/- |
| 2 | कनिष्ठ सल्लागार - बालरोग रक्तदोष-कर्करोग | एम.डी./ डीएनबी (पेडियाट्रिक) (किंवा )एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी आणि फेलोशिप इन पेडियाट्रिक हेमॅटोलॉजी - ऑन्कोलॉजी. | 50 वर्ष | 1 | 1,50,000/- |
| 3 | अति दक्षता बालरोग तज्ञ (पूर्णवेळ) | एमडी/ डीएनबी (पेडियाट्रिक्स) (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी. आणि फेलोशिप इन पेडियाट्रिक इन्टेन्सीव केअर | 50 वर्ष | 1 | 1,50,000/- |
| 4 | सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | 1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेला असावा.<br>2) उमेदवार हा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (Maharashtra Medical Council) यांचेकडे नोंदणीकृत असावा.<br>3) उमेदवाराने मान्यताप्राप्त रुग्णालयातून सहा महिन्याचे दोन सत्र आवासी अधिका-यांचे पद (House Officer Post) किंवा एक वर्षाचे निवासी वैद्यकीय अधिका-यांचे पद (One year Residency Post) इतका अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे. | 50 वर्ष | 1 | एम.बी.बी.एस. 90,000/-<br>एमडी 1,00,000/- |
| 5 | मानद बालरोग शल्यक्रिया तज्ञ | एम.सीएच/डीएनबी इन पेडियाट्रिक सर्जरी (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी. | 50 वर्ष | 1 | 20,000/- |
| 6 | मानद त्वचारोग तज्ञ | एमडी/डीएनबी (Skin & VD) (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी. बीएमटी सेटअप चा अनुभव असलेल्यांना प्राधान्य. | 50 वर्ष | 1 | 20,000/- |
| 7 | मानद हृदयरोग तज्ञ | डीएम / डीएनबी (कार्डिओलॉजी) किंवा एमडी / डीएनबी (पेडियाट्रिक) (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी आणि फेलोशिप इन पेडियाट्रिक कार्डियोलॉजी | 50 वर्ष | 1 | 20,000/- |
| 8 | मानद नेत्ररोग तज्ञ | उमेदवार मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून एम. एस.(Opthalmology) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | 50 वर्ष | 1 | 20,000/- |
| 9 | मुख्य परिचारिका / परिचारिका समन्वयक | एमसीजीएम किंवा शासकीय रुग्णालयातील निवृत्त मेट्रन किंवा सिस्टर इंचार्ज पदधारक यापदावरील 10 वर्षाचा अनुभव किंवा शासकीय रुग्णालये वगळता इतर ठिकाणची मेट्रन / सिस्टर इंचार्ज या पदावरील 10 वर्षाचा अनुभव | 1.मनपा / शासकीय रुग्णालय सेवेतून निवृत्त कमाल- 62 वर्ष<br>2. इतर अशासकीय रुग्णालयामधील सेवेतून निवृत्त धारकाकरीता कमाल - 55 वर्ष | 1 | 81,900/- (सेवानिवृत्त मनपा कर्मचाऱ्यांकरिता पे – पेन्शन) |
| 10 | श्रवणतज्ञ (अर्ध वेळ) | मान्यताप्राप्त विद्यापीठातून BSALP (बॅचलर ऑफ ऑडिओलॉजी अँड स्पीच लॅंग्वेज पॅथॉलॉजी) | 38 वर्ष | 1 | 20,000/- |
| 11 | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | उमेदवार मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून सोशल वर्कची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास बालरोग, रक्तदोष विभागाचा अनुभव असणे आवश्यक किंवा रुग्णालयातील अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. | 38 वर्ष | 1 | 40,000/- |
| 12 | समुपदेशक | 1) एम.ए / एम.एससी (कौन्सेलिंग) किंवा पोस्ट ग्रॅज्युएटी डिप्लोमा इन कौन्सेलिंग.<br>2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणाचा मराठी विषय (निम्न किंवा उच्च स्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.<br>3) महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे MS-CIT किंवा GECT चे परिक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारक असावा. | 38 वर्ष | 1 | 35,000/- |
| 13(अ) | परिचारीका | B.Sc. नर्सिंग (किंवा) म.न.पा. नियमावली नुसार, बारावी सायन्स नंतर जीएनएम नर्सिंग कोर्स सह नर्सिंग कौन्सिलकडे नोंदणी-अनिवार्य | 38 वर्ष | 1 | 30,000/- |
| 13(ब) | परिचारीका (LOCUM) (6 महिन्यांकरीता) | B.Sc. नर्सिंग (किंवा) म.न.पा. नियमावली नुसार, बारावी सायन्स नंतर जीएनएम नर्सिंग कोर्स सह नर्सिंग कौन्सिलकडे नोंदणी-अनिवार्य | 38 वर्ष | 1 | 30,000/- |
| 14 | डाटा ऐंट्री ऑपरेटर | 1) उमेदवार हा मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवी परीक्षा उतीर्ण असावा. (वाणिज्य शाखेतील उमेदवारांना प्राधान्य)<br>2) उमेदवार इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि. व मराठी 30 श.प्र.मि. शासन मान्यता प्राप्त संस्थेचे प्रमाणपत्र उतीर्ण असावा.<br>3) रुग्णालयीन कामकाजातील डाटा इंट्री कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | 38 वर्ष | 2 | 18,000/- |

टिप: अनु .क्र. 14 करिता संगणकावर मराठी व इंग्रजी करीताची टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी (टायपिंग ट्रेड टेस्ट) घेण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती-**

सर्वसाधारण अटी व शर्ती मनपाच्या http://www.mcgm.gov.in व मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू) केंद्राच्या https://www.ctcphobmt.com संकेतस्थाळावर देण्यात आली आहे.

**विशेष सुचना:**

1) सदर निवड प्रकिया कुठल्याही वेळी स्थगित करण्याचे अधिकार हे मा. महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.
2) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.
3) टपालाने / कुरिअरने /ई-मेलद्वारे आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
4) पात्र उमेदवारांच्या मुलाखती संबंधी ठिकाण, दिनांक व वेळ मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू) केंद्राच्या https://www.ctcphobmt.com संकेतस्थळावर देण्यात येईल.


23/09/2025
डॉ. संतोष खुडे
उप संचालक,
मनपा - सीटीसी, पीएचओ
आणि बीएमटी केंद्र

23/09/2025
डॉ.रत्ना शर्मा
संचालक,
मनपा - सीटीसी, पीएचओ
आणि बीएमटी केंद्र

डॉ. मोहन जोशी
अधिष्ठाता
लो.टि.म.स. रुग्णालय
23/9/25

23/9/25
डॉ. नीलम अंद्राडे
संचालक (वै.शि.व प्र.रु)
Director (M.E.&M.H.)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरिवली (पू.)

(लो.टि.म. वैद्यकिय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)

क्र. एलटीएच/ 601 /सीटीसी दि. 01/10//2025

## जाहिरात

मनपा - कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष - कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू) येथील अति विशेष सेवा, सुविधा व उपचार केंद्राकरीता अनु क्र 1 ते 14 नमूद केलेली पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर 1 वर्षाच्या कालावधीकरीता दर 6 महिन्यांनी एक दिवस तांत्रिक सेवा खंड सापेक्ष भरावयाची आहेत.

विहीत नमुन्यातील अर्ज मनपाच्या http://www.mcgm.gov.in तसेच या रुग्णालयाच्या http://www.ctcphobmt.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी पदासाठी **रू. 790 + 18% GST** इतके अर्ज शुल्क आणि सर्व बाबींची पूर्तता केलेले अर्ज, सर्व प्रमाणपत्रांच्या स्वंय साक्षांकीत छायांकित प्रती, अलीकडेच स्वंय काढलेले पासपोर्ट छायाचित्र त्यावर चिकटवुन मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू), मुंबई - 400066 येथे दि. **06 / 10 / 2025** ते दि. **14 / 10 / 2025** पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) स.10.00 ते दु. 01.00 पर्यंत भरुन द्यावे. अपूर्ण अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

| अ. क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | अर्हता | वयोमर्यादा (कमाल वर्ष) | पद संख्या | ठोक वेतन दरमहा(रू.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वैद्यकीय संक्रमण सल्लागार (पूर्णवेळ) | एमडी/डीएनबी (ट्रान्सफ्युजन मेडिसिन) (किंवा) पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन इम्युनो-हेमॅटोलॉजी आणि रक्त संक्रमण (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी<br>आणि<br>5 वर्षाचा अनुभव. | 50 वर्ष | 1 | 2,16,000/- |
| 2 | कनिष्ठ सल्लागार - बालरोग रक्तदोष-कर्करोग | एम.डी./ डीएनबी (पेडियाट्रिक) (किंवा )एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी<br>आणि<br>फेलोशिप इन पेडियाट्रिक हेमॅटोलॉजी - ऑन्कोलॉजी. | 50 वर्ष | 1 | 1,50,000/- |
| 3 | अति दक्षता बालरोग तज्ञ (पूर्णवेळ) | एमडी/ डीएनबी (पेडियाट्रिक्स) (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी.<br>आणि<br>फेलोशिप इन पेडियाट्रिक इन्टेन्सीव केअर | 50 वर्ष | 1 | 1,50,000/- |
| 4 | सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | 1) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेला असावा.<br>2) उमेदवार हा महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (Maharashtra Medical Council) यांचेकडे नोंदणीकृत असावा.<br>3) उमेदवाराने मान्यताप्राप्त रुग्णालयातून सहा महिन्याचे दोन सत्र आवासी अधिका-यांचे पद (House Officer Post) किंवा एक वर्षाचे निवासी वैद्यकीय अधिका-यांचे पद (One year Residency Post) इतका अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे. | 50 वर्ष | 1 | एम.बी.बी.एस. 90,000/-<br>एमडी 1,00,000/- |
| 5 | मानद बालरोग शल्यक्रिया तज्ञ | एम.सीएच/डीएनबी इन पेडियाट्रिक सर्जरी (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी. | 50 वर्ष | 1 | 20,000/- |
| 6 | मानद त्वचारोग तज्ञ | एमडी/डीएनबी (Skin & VD) (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी. बीएमटी सेटअप चा अनुभव असलेल्यांना प्राधान्य. | 50 वर्ष | 1 | 20,000/- |
| 7 | मानद ह्दयरोग तज्ञ | डीएम / डीएनबी (कार्डिओलॉजी)<br>किंवा<br>एमडी / डीएनबी (पेडियाट्रिक) (किंवा) एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी आणि फेलोशिप इन पेडियाट्रिक कार्डियोलॉजी | 50 वर्ष | 1 | 20,000/- |
| 8 | मानद नेत्ररोग तज्ञ | उमेदवार मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून एम. एस.(Opthalmology) ही पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | 50 वर्ष | 1 | 20,000/- |
| 9 | मुख्य पारिचारिका / पारिचारिका समन्वयक | एमसीजीएम किंवा शासकीय रुग्णालयातील निवृत्त मेट्रन किंवा सिस्टर इंचार्ज पदधारक यापदावरील 10 वर्षाचा अनुभव<br>किंवा<br>शासकीय रुग्णालये वगळता इतर ठिकाणची मेट्रन / सिस्टर इंचार्ज या पदावरील 10 वर्षाचा अनुभव | 1.मनपा / शासकीय रुग्णालय सेवेतून निवृत्त कमाल- 62 वर्ष<br>2. इतर अशासकीय रुग्णालयामधील सेवेतून निवृत्त धारकाकरीता कमाल - 55 वर्ष | 1 | 81,900/-<br>(सेवानिवृत्त मनपा कर्मचाऱ्यांकरिता पे – पेन्शन) |
| 10 | श्रवणतज्ञ (अर्ध वेळ) | मान्यताप्राप्त विद्यापीठातून BSALP (बॅचलर ऑफ ऑडिओलॉजी अँड स्पीच लॅंग्वेज पॅथॉलॉजी) | 38 वर्ष | 1 | 20,000/- |
| 11 | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | उमेदवार मान्यताप्राप्त संस्था / विद्यापीठातून सोशल वर्कची पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास बालरोग, रक्तदोष विभागाचा अनुभव असणे आवश्यक किंवा रुग्णालयातील अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. | 38 वर्ष | 1 | 40,000/- |
| 12 | समुपदेशक | 1) एम.ए / एम.एससी (कौन्सेलिंग) किंवा पोस्ट ग्रॅज्युएटी डिप्लोमा इन कौन्सेलिंग.<br>2) उमेदवार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत 100 गुणाचा मराठी विषय (निम्न किंवा उच्च स्तर) घेऊन उत्तीर्ण असावा.<br>3) महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे MS-CIT किंवा GECT चे परिक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र धारक असावा. | 38 वर्ष | 1 | 35,000/- |
| 13 (अ) | परिचारीका | B.Sc. नर्सिंग (किंवा) म.न.पा. नियमावली नुसार, बारावी सायन्स नंतर जीएनएम नर्सिंग कोर्स सह नर्सिंग कौन्सिलकडे नोंदणी-अनिवार्य | 38 वर्ष | 1 | 30,000/- |
| 13 (ब) | परिचारीका (LOCUM) (6 महिन्यांकरीता) | B.Sc. नर्सिंग (किंवा) म.न.पा. नियमावली नुसार, बारावी सायन्स नंतर जीएनएम नर्सिंग कोर्स सह नर्सिंग कौन्सिलकडे नोंदणी-अनिवार्य | 38 वर्ष | 1 | 30,000/- |
| 14 | डाटा ऐंट्री ऑपरेटर | 1) उमेदवार हा मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवी परीक्षा उतीर्ण असावा. (वाणिज्य शाखेतील उमेदवारांना प्राधान्य)<br>2) उमेदवार इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि. व मराठी 30 श.प्र.मि. शासन मान्यता प्राप्त संस्थेचे प्रमाणपत्र उतीर्ण असावा.<br>3) रुग्णालयीन कामकाजातील डाटा इंट्री कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | 38 वर्ष | 2 | 18,000/- |

टिप: अनु .क्र. 14 करिता संगणकावर मराठी व इंग्रजी करीताची टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी (टायपिंग ट्रेड टेस्ट) घेण्यात येईल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती-**

सर्वसाधारण अटी व शर्ती मनपाच्या http://www.mcgm.gov.in व मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू) केंद्राच्या https://www.ctcphobmt.com संकेतस्थाळावर देण्यात आली आहे.

**विशेष सुचना:**

1) सदर निवड प्रकिया कुठल्याही वेळी स्थगित करण्याचे अधिकार हे मा. महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

2) यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले / प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

3) टपालाने / कुरिअरने /ई-मेलद्वारे आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

4) पात्र उमेदवारांच्या मुलाखती संबंधी ठिकाण, दिनांक व वेळ मनपा- सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू) केंद्राच्या https://www.ctcphobmt.com संकेतस्थळावर देण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
| **डॉ. संतोष खुडे**<br>**उप संचालक,**<br>**मनपा - सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र** | **डॉ.रत्ना शर्मा**<br>**संचालक,**<br>**मनपा - सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र** | **डॉ. मोहन जोशी**<br>**अधिष्ठाता**<br>**लो.टि.म.स. रुग्णालय** | **डॉ. नीलम अंद्राडे**<br>**संचालक (वै.शि.व प्र.रु)** |

# अर्जाचा नमुना

## वैयक्तीक माहितीपत्र (BIO DATA)

**जाहिरातीचा संदर्भ:-** दि. / / 2025

उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकारचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी.

1. पदाचे नाव: ----------------------------------------------------------------
2. (अ) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) (मराठीत): ------------------------------------------

   (इंग्रजी): ------------------------------------------

   (ब) वडिलांचे/ पतीचे संपूर्ण नाव: ------------------------------------------

   (क) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरीता): ------------------------------------------

   (इंगजी): ------------------------------------------
3. पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता (पिन कोड सहीत): ------------------------------------------

   ------------------------------------------------------------------

   ------------------------------------------पिनकोड- | | | | | | |

   कायमचा पत्ता (पिन कोड सहीत): ------------------------------------------

   ------------------------------------------------------------------

   ------------------------------------------पिनकोड- | | | | | | |
4. मोबाईल | | | | | | | | | | | ई- मेल ------------------------------------------
5. लिंग: पुरुष / स्त्री आधार कार्ड नं.: | | | | | | | | | | | | |
6. अ) जन्म दिनांक: महिना: वर्ष:

   ब) जाहिराती मध्ये दर्शविलेल्या फॉर्म भरण्याच्या पहिल्या दिनांकाप्रमाणे दि. 04/10/2025 रोजी असलेले वय वर्षे ...... महिने ..... दिवस.....
7. शैक्षणिक अर्हता: ______________________________________

   (पदाच्या शैक्षणिक पात्रते अन्वये)

| शैक्षणिक अर्हता | शालांत परिक्षा/ मंडळ/ विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | टक्के वारी | उत्तीर्णतेचे प्रयत्न | एस.एस.सी./एच.एस.सी. परिक्षेतील मराठी विषयांतील गुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | | | प्राप्त गुण | पैकी |
| एस.एस.सी. | | | | | | | |
| एच.एस.सी. | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदवीत्तर | | | | | | | |
| इतर | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

| **महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषद / नर्सिंग परिषद / फार्मसी परिषद** | **नोंदणी क्रमांक** | | **नुतनीकरण तपशील** |
|---|---|---|---|
| | **नोंदणी क्रमांक** | **नोंदणी वैधता** | **नुतनीकरण दिनांक आणि वैधता दिनांक** |
| प्राथमिक नोंदणी | | | |
| अतिरिक्त अर्हता नोंदणी | | | |

8. संगणकविषयक ज्ञान: (MS-CIT) किंवा शासनाचे विहित केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र - **आहे/ नाही**

9. शासकीय निमशासकीय संस्थेत काम केल्याचा अनुभव असल्यास कालावधी :

अनुभवाचा तपशील

| अ. क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | एकुण कालावधी वर्ष महिना दिवस | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| 1. | | | | |
| 2. | | | | |
| 3. | | | | |
| | | | **एकूण अनुभव कालावधी** | |

10. स्थानिक पोलिस ठाण्याचा संपूर्ण पत्ता (पिनकोड सहित): ------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------ पिनकोड- | | | | | | |

11. अ) उमेदवारांस पुर्वी शिक्षा झाली होती का? शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. **होय / नाही**

12. अ) उमेदवारांविरुद्ध पोलिस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित वा प्रस्तावित आहे का? **होय/ नाही**

ब) असल्यास, त्याबाबतचा तपशील द्यावा? ---------------------------------------------------

13. अ) सध्या अर्जदार इतरत्र नोकरीस आहे का? **होय/ नाही**

ब) असल्यास, त्याबाबतचा तपशील देऊन सध्याच्या काम करीत असलेल्या कार्यालयाचे ना- हरकत प्रमाणपत्र जोडावे.

14. उंची ---------- फूट ------------ इंच. वजन ------------ कि. ग्रॅम. शरीराची ठेवण: किरकोळ/ मध्यम/ सुदृढ

वर्ण ---------- नेत्र वर्ण -------------- वैयक्तिक खुण --------------------

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणित करतो/ करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन असल्यास नोकरी गमाविण्यास न त्या अनुशंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस मी पात्र व बांधील राहील.

दिनांक: / /2025

ठिकाण:

अर्जदाराची सही/-

(अर्जदाराचे नाव)

# प्रपत्र — अ

## स्वंयघोषणापत्र

उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकारचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी.

मी .................................................. श्री. .......................................... यांचा मुलगा / मुलगी वय ..................... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) ...................................... व्यवसाय ................................ राहणार .............................. याद्वारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिती अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण - अर्जदाराची सही .....................................

दिनांक - अर्जदाराचे नाव ......................................

## प्रपत्र — ब

## स्वंय-साक्षांकनासाठी स्वंय-घोषणापत्र

उमेदवाराने त्यांचे अलिकडे काढलेले पारपत्र आकारचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी.

मी ............................................... श्री. ........................................ यांचा मुलगा / मुलगी वय .................... वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) .................................... व्यवसाय ............................... राहणार ............................. याद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्या सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिती आणि संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण - अर्जदाराची सही ....................................

दिनांक - अर्जदाराचे नाव .....................................

विहित नमुन्यातील अर्जासोबत जोडण्यात आलेल्या साक्षांकीत प्रती:

| अनु क्र | विवरण | जोडले ( √ ) | सही व दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | कंत्राटी तत्वावरील पदासाठीचे विहित नमुन्यातीलअर्ज | | |
| 2 | पासपोर्ट साइज फोटो | | |
| 3 | दहावी गुणपत्रिका | | |
| 4 | बारावी गुणपत्रिका | | |
| 5 | पदवी गुणपत्रिका | | |
| 6 | पदवी प्रमाणपत्र | | |
| 7 | आधार कार्ड | | |
| 8 | अनुभव प्रमाणपत्र | | |
| 9 | एमएस- सीआयटी (MS-CIT) प्रमाणपत्र | | |
| 10 | वैयक्तिक माहितीपत्र / बायो डेटा | | |
| 11 | अतिरिक्त शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र | | |
| 12 | MMC नोंदणी (डॉक्टरांसाठी) | | |
| 13 | अतिरिक्त पात्रता MMC Registration (डॉक्टरांसाठी) | | |
| 14 | नर्सिंग मेडिकल कौन्सिल नोंदणी (परिचारीकांसाठी) | | |
| 15 | स्वयंघोषणापत्र | | |
| 16 | अर्ज शुल्क भरणा केलेली पावती नंबर | | |

## उमेदवारांकरीता सूचना

1. भरती प्रक्रियेतील सर्व सूचना संकेतस्थळ https://www.ctcphobmt.com या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.
2. उमेदवाराने अर्ज संपूर्णत: अचूक भरावा. पत्र व्यवहाराचा पत्ता पिनकोड सह अचूक असावा. उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा वैध ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे.
3. अर्जामध्ये उमेदवाराने पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती नमूद करणे आवश्यक आहे. अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास त्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा अटी तपासूनच उमेदवारांची अर्ज सादर करावा.
4. उमेदवारांचा अर्ज प्रथमत: त्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीवरुन पडताळला जाईल. सदर पात्र यादी मध्ये उमेदवारांची नावे, मूळ कागदपत्रे पडताळणीसाठीचा दिनांक, वेळ व इतर तपशिल प्रसिध्द करण्यात येईल. उपरोक्त यादीमध्ये ज्या उमेदवारांची नावे नमूद करण्यात येतील त्यांनी वेळापत्रकानुसार मनपा-सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र, बोरीवली (पू) सीसीआय कंपाऊंड, मुंबई - 400 066 येथे सर्व मूळ प्रमाणपत्रासह पडताळणीकरीता उपस्थित रहावे.
5. उमेदवारांना भरतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
6. तात्पुरत्या पात्र यादीमध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची सखेल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमदवार अपात्र आढळल्यास किंवा निवडीच्या विहीत अर्हता पूर्ण करीत नाही असे निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर आढळल्यास त्यास निवड प्रकियेतून बाद करण्यात येईल पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही
7. पात्र उमेदवारांची अंतिम यादी https://www.ctcphobmt.com संकेतस्थळावरच प्रसिध्द करण्यात येईल.
8. सदर भरती प्रक्रियेसदंर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना मनपा-सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र, बोरीवली (पू) संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वरील संकेतस्थळ उमेदवारांनी वेळोवेळी पहावी.

## सर्वसाधारण अटी

1. रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील तथापि कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार तसेच निवड प्रक्रियेत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना राहतील.
2. अर्ज विहीत नमुन्यात सर्व दृष्टीने पूर्ण भरलेला असावा, विहीत नमुन्यामध्ये नसलेले, विहीत दिनांक व वेळेनंतर प्राप्त झालेले तसेच अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच अर्जामध्ये नमूद केलेल्या माहिती बाबत आवश्यक सर्व प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल उमेदवारांना ई-मेल आयडी पत्र व्यवहाराचा पत्ता (पिन कोड सह ) सुस्पष्ट व पूर्ण असावा.
3. अलिकडच्या काळात काढलेले पासपोर्ट आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्यांच्या स्वाक्षरीसह अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या दोन अतिरिक्त प्रती पुढी निवड प्रक्रियेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.
4. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकीत प्रतीसाठी वारण्यात येणाऱ्या) A-4 आकारातील असावे
5. उमदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहीत अर्हता व अटी पुर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्यांची उमदवारी रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही नेमणूक झाली आल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.
6. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्तांचे "ना हरकत प्रमाणापत्र" सादर करणे आवश्यक आहे.
7. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबदतचे अधिवास प्रमाणपत्र उमेदवाराने भरतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.
8. उमेदवाराने खाली नमूद केलेली शैक्षणिक प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रांच्या छायांकित व स्वाक्षांकीत प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे तसेच सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती तपासणीसाठी नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.
   अ) उमेदवारांनी अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हतेबाबतच्या सर्व गुणपत्रिका व प्रमाणपत्र, 50/100 गुणांची मराठी परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र, संलग्नीत कौन्सिलचे नुतनीकरण केल्याचा प्रमाणपत्र, एमएससीआयटी प्रमाणपत्र (अ.क्र. 14 वरील पदाकरीता) यांच्या छांयाकित साक्षांकीत प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
   आ) विवाहित महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र सादर करावे तसेच ते नसल्यास विवाहित महिला विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
   इ) उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्तांचे "ना हरकत प्रमाणापत्र" सादर करणे आवश्यक आहे.
   ई) फोटो असलेले ओळखपत्र उदा. आधारकार्ड, पॅनकार्ड आवश्यक आहे.
9. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा. महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
10. निवड झालेल्या उमेदवारांविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलिस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.
11. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चूकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
12. अर्ज सादर करावयाची पध्दत: पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांनी सर्व आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रतींसह जाहिरातीत नमूद केलेल्या ठिकाणी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.